| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| ३—चालू | | (पाच) स्वच्छता निरीक्षक | .. जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम आरोग्य) प्रथम श्रेणी या श्रेणीतील तीन वर्षापेक्षा कमी नसेल इतकी अखंड सेवा केलेल्या योग्य कनिष्ठ स्वच्छता निरीक्षकांना पदोन्नती देऊन नेमणूक करण्यात येईल. |
| | | (सहा) आरोग्य सहाय्यक | .. (अ) नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यासाठी विहित करण्यात आलेला पाठ्यक्रम पूर्ण केलेल्या कनिष्ठ आरोग्य प्रचारकांना पदोन्नती देऊन नेमणूक करण्यात येईल.<br>किंवा<br>(ब) जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय [1][२८] वर्षांपेक्षा अधिक नसेल.<br>(दोन) इंटरमिजिएट मायन्स किंवा तुल्य परिक्षा उत्तीर्ण झाले असतील आणि<br>(तीन) उमेदवाराला जी कार्ये करावी लागतात त्या कार्यांच्या क्षेत्रातील राज्य सरकारने मान्यता दिलेला विशेष पाठ्यक्रम ज्यांनी पूर्ण केला असेल अशा उमेदवारामधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल.<br>(दोन) नामनिर्देशन व पदोन्नती याद्वारे करावयाच्या नेमणुकांचे प्रमाण १:३ असे असेल. |
| | | (सात) आरोग्य प्रचारक<br>(आठ) कनिष्ठ आरोग्य पर्यवेक्षक | .. (१) (अ) अर्हता प्राप्त आरोग्य प्रचारक आणि महाराष्ट्र परिचर्या परिषद किंवा विदर्भ परिचर्या परिषदेमध्ये नोंदणी झालेल्या किंवा अशा नोंदणीसाठी पात्र असलेल्या कनिष्ठ आरोग्य प्रचारकांना पदोन्नती देऊन नेमणूक करण्यात येईल. |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक २९ सप्टेंबर १९८३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (२) | (३) | (४) |
|---|---|---|
| जिल्हा तांत्रिक सेवा (आरोग्य) श्रेणी दोन. | आरोग्य सहाय्यक | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) श्रेणी तीनमधील ज्या आरोग्य कर्मचाऱ्यांनी—<br>(१) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केलेली असेल, आणि<br>(२) ज्यांनी बहुउद्देशीय आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी असणारा १२ महिन्यांचा पाठ्यक्रम अथवा स्वच्छता निरीक्षकाचा पाठ्यक्रम वा तुल्य पाठ्यक्रम यशस्वी रीत्या पूर्ण केलेला असेल अशा आरोग्य कर्मचाऱ्यांमधून पदोन्नती देऊन नेमणूक करण्यात येईल :<br>परंतु ज्या आरोग्य कर्मचाऱ्यांनी मान्यताप्राप्त आरोग्य निरीक्षकांचा पाठ्यक्रम या तुल्य असा पाठ्यक्रम पूर्ण केलेला नाही, त्यांनी सेवेत असताना त्या बाबतीत विहित करण्यात येईल असे पदोन्नती संबंधीचे प्रशिक्षण यशस्वी रीत्या पूर्ण केल्यानंतरच त्यांना पदोन्नतीसाठी पात्र समजण्यात येईल. |
| जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग ३) (आरोग्य) श्रेणी तीन. | आरोग्य कर्मचारी | जे उमेदवार—<br>(१) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय २८ वर्षापेक्षा जास्त नसेल,<br>(२) ज्यांनी भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व जीवशास्त्र वा सामान्य विज्ञान हे विषय घेऊन माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केलेली असेल, आणि<br>(३) ज्यांनी बहुउद्देशीय आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी असणारा १२ महिन्यांचा मूलभूत पाठ्यक्रम यशस्वी रीत्या पूर्ण केलेला असेल अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. |

Scanned with OKEN Scanner